निं.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u>** - सचिन गोवर्धन आठवले

**<u>वय</u>** - ४१ वर्ष, **<u>पद</u> -** वन परिक्षेत्र अधिकारी

**<u>नेमणूक</u>** - खापा, वन विभाग, तह. सावनेर, जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत</u>.**

दि. १४.०३.२०२५ रोजी मी वन परिक्षेत्र अधिकारी खापा येथे कार्यरत होतो. दुपारी २.०० वाजता आम्हाला सिरोंजी, पोलिस पाटील यांचा फोन आला की भंगळनाला येथे एक वाघ मृत आढळलेला दिसला. मी, श्री. सतीश गडलिंगे, वन वर्तुळ अधिकारी, खुबाळा व इतर कर्मचारी असे आम्ही मोक्यावर गेलो. सदर घटनेची माहिती वरिष्ठ वन अधिकारी सहाय्यक वन संरक्षक विजय गंगावने, नागपूर, उप वन संरक्षक श्री. भारतसिंग हाडा यांनी दिली. मोक्यावर पाहिले की, तिथे एक मोठा ३ ते ३.५ वर्षाचा वाघ नाल्या शेजारी मृत अवस्थेत पडला होता. वाघाचे निरिक्षण केले असता वाघाचे ४ पायाचे पंजे कापून नेल्याचे आढळले. वाघाच्या मिशा व ४ सुळे दात काढून नेल्याचे दिसले. तिथे वरिष्ठ अधिकारी आले. नॅशनल टायगर कंझरवेशन ओथोरिटी यांच्या निर्देशाप्रमाणे ५०० मिटर परिसरामध्ये ४ टिमचे नियोजन करून परिसराची पाहणी केली. परिसर पाहणीमध्ये मोक्यापासून नाल्याच्या ३०० मिटर अंतरावर एक सलग सागवन खुंटया आढळून आल्या. नाल्याला लागून सर्वे क्र. १११ आहे, तेथे इलेक्ट्रीक पोल आहे, त्या दिशेने सुध्दा सागवन खुंटया लागल्याचे आढळून आले. इलेक्ट्रीक पोलची पाहणी केली असता त्या पोलवरून ११ के. वी. विद्यूत लाईन जात होती. त्यावर लोखंडी तारेचे आकोडे दिसून आले तसेच त्या पोलच्या खाली जळलेले बारीक तारेचे तुकडे दिसून आले. खुंटयाला बारीक सेंटींग तार लागलेला दिसून आला. जिथे मृत वाघ पडला होता त्याच्या आजू-बाजूला बोरीचे लाकूड दिसून आले व त्यावर रक्त सांडल्याचे दिसून आले. सदर लाकडावर वाघाचा पंजा ठेवून

कापले असावे असा निष्कर्ष काढण्यात आला. इलेक्ट्रीक पोल पासून वाघ मृत झाल्याच्या ठिकाणाच्या आजू-बाजूपर्यंत तार आणली होती. मध्यप्रदेश - सिरोंजी रस्ता घटनास्थळाच्या विरुध्द दिशेला आहे, त्या रस्त्यावर पुल आहे, त्याच्या खालपर्यंत सागवनी खुंटयावर तार आणली होती. पुलाच्या जवळ तारचे बंडल दिसले. घटनास्थळाची दुस-या दिवशी पाहणी केली त्यावेळी आम्ही श्वान पथक घेवून गेलो होतो. आकोडयाचे तार जी. आय. तार होते. वाघाचे मोजमाप पंचांसमक्ष घेण्यात आले. पंचांना सतिश गडलिंगे यांनी बोलावले. मला घटनास्थळ-जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व हजर असलेल्या लोकांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १४** देण्यात येते. घटनास्थळावरून बोरीचे लाकूड, खुंटया, तार, बांबू, तारचे बंडल व मृत वाघ जप्त करण्यात आले.

**जप्त मुद्देमाल हजर करण्याकरिता सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.08.20 17:56:32 +0530

सावनेर,
दिनांक २०.०८.२०२५

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी
निशाणी क्र. १३

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe